

To follow the Rules for **Cyber Cafes** as given in IT Act of India, the **Superintendent of Police**

# Mr. Krishna Prakash

has Recommended **iCAFE MANAGER Products**

From 28th July 2010 in

## Ahmednagar

For more information please contact:

**Sachin Gapat| sachin@ideacts.com| 9890015527**

or contact us on

Toll Free Number **1800 209 1911|** partners@icafemanager.com

or register now on www.icafemanager.com

जा.क्र. परवाना शाखा/ हॉटेल/सायबर/ ३४५५/२०१०
पोलीस अधीक्षक कार्यालय, अहमदनगर
अहमदनगर दिनांक :- २८/ ०८/ २०१०

प्रति,

श्री./श्रीमती - - - - - - - - - - - - - - - - - - - -
प्रो.प्रा. :- - - - - - - - - - - - - - - - - - - - -
पत्ता :- - - - - - - - - - - - - - - - - - - - -
(सायबर कॅफे परवाना क्र. )
( मार्फत :- पो.नि./सपोनि. पोलीस ठाणे, अहमदनगर )

विषय :- सायबर कॅफेमध्ये Clink Cyber Cafe Manager सॉफ्टवेअर लावणेबाबत..

महोदय,

महाराष्ट्र शासन, राजपत्र दिनांक २१/०६/२००७ मध्ये प्रसिध्द झालेल्या नियमावलीनुसार आपले सायबर कॅफे आस्थापनेस नियम - ९३ प्रमाणे जागा परवाना (Premises Licence ) देण्यांत आला आहे. सदर नियमाअंतर्गत देण्यांत आलेल्या परवान्यावर सदर सायबर कॅफे संदर्भात असलेल्या अटी व शर्ती नमुद करण्यांत आल्या आहेत. त्यासतील **अट क्रमांक १०** प्रमाणे प्रत्येक अभ्यागताचे फोटो असलेले ओळखपत्र घेणे आवश्यक आहे. अट **क्रमांक ११** प्रमाणे फॉर्म - एम प्रमाणे नोंदवही ठेवणे आवश्यक आहे. अट **क्रमांक १५** प्रमाणे प्रत्येक मशिनसाठी इंटरनेट प्रोटोकॉल ॲड्रेस घेणे आवश्यक असुन अट **क्रमांक १६** प्रमाणे इलेक्ट्रानीक लॉग ठेवुन कोणत्या कॅम्प्युटरवर कोणत्या अभ्यागताने केव्हापासुन केव्हापर्यंत वापर केला याची माहिती ठेवणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारची माहिती ठेवली जात नसलेबाबत आढळुन आले आहे. काही लोक चुकीचे नांव/पत्ता देवुन कॅम्प्युटर वापरतात व त्यानंतर अशा बाबी उघडकीस आल्यास संबंधीत सायबर कॅफे चालक चुक नसतांनाही संशयीत आरोपी बनातो. माहिती तंत्रज्ञान (सुधारीत) कायदा - २००८ मधील **सेक्शन ६७ (सी)** अन्वये अशा प्रकारे नियमास प्रतिबंध किंवा मज्जाव करणारी व्यक्ती ही मध्यस्थी करणारी व्यक्ती समजन गन्हा दाखल करण्याची तरतुद आहे. तसेच **भारतीय दंड संहिता कलम २०४** प्रमाणे जो कोणी न्यायालयात एखाद्यासमोर कायदेशिरपणे चाललेल्या कोणत्याही कार्यवाहीत जो कोणताही दस्तऐवज किंवा **इलेक्ट्रानिक रेकॉर्ड / लॉग** पुरावा म्हणुन हजर करणे स्वत:ला कायदेशिरपणे भाग असेल तो दस्तऐवज पुर्वोक्ताप्रमाणे अशा न्यायालयासमोर किंवा लोकसेवकासमोर अथवा या प्रयोजनासाठी स्वत:ला कायदेशिर समन्स पाठविण्यात येईल तेव्हा किंवा तो हजर करण्यास फर्मावण्यात येईल तेव्हा पुरावा म्हणुन हजर केला जावू नये किंवा वापरला जावु नये या उद्येशाने असा दस्तऐवज संपुर्णत: किंवा त्याचा कोणताही भाग दिसेनासा करील किंवा दुर्वाच्य करील त्याला दोन वर्षापर्यंत असु शकेल इतक्या मदतीची कोणत्यातरी एका वर्णनाच्या कारवासाची किंवा द्रव्य दंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील.

त्यामुळे पोलीस विभागातर्फे वेगेवगळ्या कंपन्यांशी संपर्क करुन अशा प्रकारे आपल्या अस्थापनेत येणा-या प्रत्येक व्यक्तीवर आपले लक्ष असावे तसेच सदर व्यक्ती आपल्या अस्थापनेतुन गेल्यानंतरही त्याने संपर्क केलेल्या ठिकाणांची नोंद आपल्याकडे असावी या दृष्टीने अहमदनगर जिल्हा पोलीस अधिकार क्षेत्रातील सायबर कॅफे संघटनांशी संपर्क व विचारविनीमय करुन Clink Cyber Cafe Manager हे सॉफ्टवेअर बसविण्याबाबत शिफारस करण्यात आली आहे. नियमाप्रमाणे सदर बाब अत्यंत आवश्यक झाली आहे. तरी आपण उपरोक्त सॉफ्टवेअर ७ दिवसाचे आत बसवुन घेऊन त्याची पुर्तता अहवाल पोलीस स्टेशनमार्फत या कार्यालया पाठवावा. ही विनंती

पोलीस अधिक्षक अहमदनगर

( कृष्ण प्रकाश )
पोलीस अधिक्षक, अहमदनगर

प्रत :- पो. नि./ स.पो.नि. - - - - - - - - - - - - - पोलीस ठाणे, अहमदनगर

२/- उपरोक्त नमुद प्रमाणे सायबर कॅफे आस्थापनाधारकास मुळ पत्राची प्रत अदा करुन दुस-या प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती प्रत उलट टपाली या कार्यालयास सादर करावी.

३/- संबंधीत आस्थापनांनी ७ दिवसांत उपरोक्त पत्राप्रमाणे सॉफ्टवेअर बसविले आहे किंवा नाही ? याची खात्री तसा पुर्तता अहवाल या कार्यालयास सादर करावा.







iCAFE MANAGER Products are completely **FREE of COST** for Cyber Cafes and help in:

| | |
|---|---|
| Customer Registration | Accounting |
| Print Counting | Cash Register |
| Membership Packages | Reports |
| Backup | Reminder |

---




iCAFE MANAGER Products are Used by **20,000** Cyber Cafes in more than **350** cities